| email @- | महाराष्ट्र शासन<br>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र** | call@ |
|---|---|---|
| marathilangdpt@maa.ac.in | ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३० | ०२०-२४४७६९३८ |


## राज्यातील अधिकारी /शिक्षक/कर्मचारी यांचेसाठी मराठी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षा

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शांळामधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे. या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. त्यापैकी मराठी ऑलिंपियाड स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर मराठी भाषा विभाग, SCERT, पुणे यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

१. उद्दिष्टे:

- अधिकारी /शिक्षक/कर्मचारी यांच्या मराठी भाषा विषय ज्ञानाची चाचणी घेणे.
- NEP २०२० नुसार त्यांची मराठी भाषिक सक्षमता आणि अध्यापन कौशल्ये वाढवणे.
- मराठी भाषेच्या अनुषंगाने CPD (Continuous Professional Development) ची संधी देणे.
- मराठी भाषा कौशल्य विकसनासाठी प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थ्यांसाठी अशा स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यास मदत करणे.

२. परीक्षा पातळी/स्तर:

**मराठी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचे** आयोजन तालुका, विभाग आणि राज्य पातळीवर करण्यात येईल.

३.परीक्षा स्वरूप व स्तर

**एकूण प्रश्न संख्या** -१००
**स्वरूप:** MCQs
**एकूण गुण:** १००
**कालावधी:** ९० मिनिटे
**अभ्यासक्रम स्तर :** तालुका व विभागस्तरासाठी : इयत्ता पहिली ते बारावी अभ्यासक्रम
राज्यस्तरासाठी : पदवी स्तर
**नकारात्मक गुणांकन** (Negative Marking) : प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.२५ इतक्या प्रमाणात मिळविलेल्या गुणांमधून वजावट केली जाईल.

सर्व स्तरासाठी निर्धारित केलेल्या वेळेतच विहित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा होतील. सदर प्रश्न पत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे चार विभाग असतील.

| भाग | घटक | गुण | स्वरूप |
|---|---|---|---|
| अ | भाषा व्याकरण | ३५ | MCQs |
| ब | अध्यापनशास्त्रीय ज्ञान | ३५ | MCQs |
| क | भाषिक आकलन | १० | MCQs |
| ड | मराठी भाषा सद्यस्थिती व इतिहास विषयक सामान्यज्ञान | २० | MCQs |

**४. अभ्यासक्रम :**

**अ. भाषा विज्ञान व भाषेचे व्याकरण**

१.भाषा विज्ञान

२. व्याकरण - वर्णमाला, संधी, शब्दांचे प्रकार (नाम, सर्वनाम, क्रियापद), लिंग, वचन, काळ (Tense), वाक्यांचे प्रकार. वरील सर्व घटक सखोल माहिती + समास, प्रयोग (कर्तरी, कर्मणी), अव्यये, वाक्य-पृथक्करण, शुद्धलेखनाचे नियम.

३. शब्दसंपदा- समानार्थी, विरुद्धार्थी शब्द, शब्दसमूहांबद्दल एक शब्द, म्हणी व वाक्प्रचार (सोपे). वरील सर्व घटक + अलंकार, वृत्त, रस (प्राथमिक ओळख), पारिभाषिक शब्दावली, भाषिक सौंदर्य.

४. साहित्य - प्रसिद्ध बालसाहित्यिक, कवी आणि त्यांच्या लोकप्रिय बालकृती (उदा. गीते, कथा). मराठी साहित्यप्रवाह (उदा. संत साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य), प्रमुख साहित्यिक व त्यांची योगदान, साहित्य प्रकारांची (कादंबरी, नाटक, कविता) सखोल ओळख.

ब. अध्यापनशास्त्रीय ज्ञान

भाषिक कौशल्ये:  श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्याच्या नवीन पद्धती आणि तंत्रे (Techniques).

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -  (NEP २०२०): NEP २०२० नुसार भाषिक शिक्षणातील बदल, मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व आणि त्रिभाषा सूत्राचे (Three-language formula) उपयोजन.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes):  प्रत्येक इयत्तेनुसार भाषेच्या अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) समजून घेण्याची आणि त्या साध्य करण्यासाठीच्या रणनीती.

मराठी अभाषिक अध्यापन:  ज्या विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी नाही, त्यांना मराठी शिकवण्यासाठीच्या विशेष पद्धती

मूल्यमापन: भाषिक क्षमतांचे सातत्यपूर्ण आणि सर्वंकष (CCE) मूल्यमापन करण्याच्या पद्धती.

आधुनिक साहित्य:  सध्याच्या काळात चर्चेत असलेले मराठी लेखक, कवी, साहित्यकृती आणि त्यांना मिळालेले पुरस्कार (उदा. साहित्य अकादमी).

क. भाषिक आकलन

अपरिचित उताऱ्याचे वाचन व  अपरिचित काव्य  आणि गद्य यांचे वाचन, आकलन आणि भावार्थ स्पष्ट करण्याची क्षमता.

ड. मराठी भाषा सद्यस्थिती व इतिहास विषयक सामान्यज्ञान

४. परीक्षा पातळ्या व वेळापत्रक  :

| अ. क्र. | पातळी | आयोजन कालावधी | सहभागी | निवड |
|---|---|---|---|---|
| १. | तालुका | नोव्हेंबर: २०२५ चौथा शनिवार | केद्रातून शिक्षक/कर्मचारी व जिल्ह्यातून नजीकच्या तालुक्यासाठी अधिकारी | प्रत्येक तालुक्यातून प्रथम क्रमांक |
| २. | विभाग | डिसेंबर: २०२५ चौथा शनिवार | तालुक्यातून निवडलेले उमेदवार | प्रत्येक विभागातून ५ उमेदवार |
| ३. | राज्य | जानेवारी: २०२६ चौथा शनिवार | प्रत्येक विभागातून निवडलेले उमेदवार | राज्यस्तरावर प्रथम १० उमेदवार |

५.मूल्यमापन (Assessment Criteria):

मराठी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचे मूल्यमापन तालुकास्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर विभागस्तराचे मूल्यमापन विभागस्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर राज्यस्तरचे मूल्यमापन राज्यस्तरीय समितीद्वारे होईल. मूल्यमापन केल्यानंतर विविध समित्यानी सर्व प्रश्नपत्रिकाचे जतन करून ठेवावे.

७. आयोजनाची कार्यपद्धती (Implementation Plan):

१. **प्रश्नपत्रिका तयारी** -शिक्षणतज्ज्ञांच्या समितीमार्फत मराठी भाषा विभाग, SCERT, महाराष्ट्र , पुणे
२. **नोंदणी फॉर्म वितरित** करणे (केंद्रप्रमुख)
३. **परीक्षा केंद्र निश्चित** करणे (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तालुका नोडल अधिकारी व गट शिक्षणाधिकारी
४. **मूल्यमापन समिती - तालुका, विभाग आणि राज्य**